# “सुख आणि शांती”

वर्तमानकाळात मनुष्य व्यक्तिगत किंवा संगठीत रूपाने अनेक प्रकारचे प्रयत्न वा साधना करून कोणत्याही दु:खाची पूर्ण निवृत्ती आणि वास्तविक सुख-शांती साठी धडपडतो. कित्येक यज्ञ, पूजा, जाप, ध्यान,पाठ केली जातात. कित्येक लोक घर, धन,पुत्र व त्याव्दारे सुख पाहतात, तर कित्येक त्याला सोडून देतात. राज्यसत्ता देखील अनेक योजना राबवतात. त्यावर करोडो रुपये खर्च करतात. जेणेकरून देशात, सुख,शांती आरोग्यता, वैधानिकता राहील. परंतु आमचा अनुभव प्रतिदिन वेगळा आहे. प्रत्येक व्यक्ती, समाज, राज्य, देशासमोर वेग-वेगळ्या नवनवीन विपत्ती, समस्या उभ्या राहतात व वाढत आहेत. ज्यामुळे दु:ख–अशांती वाढत आहे.मग त्याचे कारण आपसातील मतभेद असो वा निर्धनता. सुख शांती असेल तरी कशी ? साधारणत: रोगाचे निदान, ओळख असेल तर रोगाचा निपटारा होईल.तशीच परिस्थिती व्यक्तीची, राष्ट्राची आहे. रोग निवारण उपाय देखील अनेक प्रकारचे आहेत. परंतु सुख शांती साठी फक्त दोन प्रकारचे उपाय आहेत. एक आहे लौकिक, दुसरा आहे अलौकिक. जसे शरीराचा रोग निवारण्यास डॉक्टरांची औषधींचा प्रयोग म्हणजे लौकिक. या उपायात दोन त्रुटी आहेत. एक तर शरीराचा रोग पुन्हा होणार नाही याची निश्चिती नाही. पाणी,वायू, सर्दी, गरमीच्या प्रभावात पुन्हा शरीर येणार नाही हे हि निश्चित नाही. दुसरे म्हणजे या उपायाने सर्व प्रकारचे दु:ख मिटत नाहीत. ज्या प्रकारचा रोग का दु:खाचा तो उपाय असतो,त्याच रोगाचे दु:खाचे निवारण होते. अर्थात हे उपाय अल्पकालीन आहेत. तसेच लौकिक गुरु,शास्त्र जप, तप, साधना ने अल्पकाळाची एखादी कामना पूर्ण होऊ शकेल. परंतु त्यामुळे स्थायी कल्याण होत नाही. या विपरीत पारलौकिक उपाय तो, ज्यामुळे दु:ख व अशांतीची नितांत निवृत्ती आणि सुख शांतीची स्थायी प्राप्ती होते. अर्थात वर्तमान काळात सुखशांती साठी पारलौकिक उपाय अंगिकारले जात नाहीत. जगात कोणतीही, कोणाचीही कमी नाही.वृद्धी भरपूर आहे. काय सर्वच बाबींची वृद्धी दु:ख व अशांतीचे कारण आहे ? नाही मुळात चिरकाल, सुख-शांतीचा पारलौकिक उपाय मनुष्याजवळ नाही तो ‘परमात्मा, गाड  जवळ आहे. सुख व शांतीचा आधार हा वस्तू, वैभव, मान, ज्ञान, धन नाही, तो आहे पवित्रता. मनुष्य स्वधर्माच्या, ज्ञानाच्या आधारावर, पवित्र कर्तव्यांचा त्याग करून, कर्म केल्याने मानसिक द्वंद ,निर्बलता,चंचलता,विचलीनता व त्याच्या दंडाच्या भयाने अशांत राहतो. अनेक जन्माच्या विकार्माने, संस्काराने मनुष्य एकरस अवस्थेत राहू शकत नाही. ‘शांती’ हा खरा धर्म, निज स्वरूप आहे हे तो विसरला आहे आणि जे पाहिजे त्याचा खऱ्या अर्थाने आम्ही पाठलाग करीत नाहीत.

पाच तत्व, शरीराव्दारे, भूकंप, पूर, अति वर्षा या व अनेक प्रकारे उथल-पुथल होत राहते.त्या देखील अशांतीचे कारण आहेत. प्रकृती मध्ये आता सतोगुणता नाही म्हणून शरीर रोगी बनले आहे. खाद्य वस्तूमध्ये सत्व नाही यावरून हे स्पष्ट होते कि, मनुष्याने केलेल्या पापामुळे ही दु:खाची व्यवस्था त्याच्यासाठी आहे. नसता,ईश्वर सृष्टीत अन्याय नाही. प्रकृतीची रचना याचसाठी कि, कर्मक्षेत्रावर, मनुष्य शुभकर्मा व्दारे, सुख आणि अपवित्र कर्माव्दारे, दु:ख तथा प्रकृतीची परतंत्रा भोगेल म्हणून सुख शांतीसाठी आवश्यक आहे की, प्रकृतीमध्ये सतोगुण प्रधानता असणे. मनुष्य आत्मा शुध्द असणे, जेणेकरून निरोगी वा सतोगुणी शरीर मिळेल आणि तमोगुणी-आसुरी स्वभावाचा अंत होणे आवश्यक आहे. सतोप्रधान सतयुगी सृष्टीची स्थापना करणे आणि तमोप्रधान कलियुगाचा विनाश करणे हे तर परमेश्वराचे दिव्य कर्म आहे.

ब्र.कु. लक्ष्मीकांत जोगी भाई, नांदेड.